# मे महिन्यात

# समयाला समय देणे

१ मे, २०२५

आत्मीय वाचक,

ते काय आहे, जे चिरकाल टिकून राहते? ते काय आहे, जे समयाच्या कसोटीवर खरे उतरते? ते काय आहे, जे समयाच्या पलीकडे आहे—किंवा कदाचित समयानंतरही त्याचे अस्तित्व टिकून राहते? ते अदृश्य धागे कोणते आहेत जे भूतकाळाला वर्तमानाशी आणि वर्तमानाला भविष्याशी जोडतात आणि आपण त्यांना तेव्हा कसे ओळखावे, जेव्हा क्षणभरासाठी का होईना, पण आपल्याला त्यांची एक झलकमात्र आपल्या बोधात दिसते?

मे महिन्यात पाऊल टाकत असताना, हे प्रश्न माझ्या चेतनेत पुन्हापुन्हा उद्‌भवत आहेत, माझ्या मनात उत्सुकता निर्माण करत आहेत. मे महिना म्हणजे बाबांचा महिना. १९९०च्या दशकातील एका सत्संगादरम्यान श्रीगुरुमाईंनी मे आणि ऑक्टोबर या महिन्यांना 'बाबांचा महिना' हे नाव पहिल्यांदा दिले होते, जे अनुक्रमे बाबांचा जन्मदिवस आणि त्यांचा महासमाधी दिवस असलेले महिने आहेत. हे नाव ऐकताच सिद्धयोगी तत्काळ उत्साहित झाले; त्यांना हे नाव खूपच आवडले आणि तेव्हापासून हे नाव रूढ झाले.

हे अद्भुत आहे. मे महिन्याला पुढे जाणाऱ्या समयाचा एक विशिष्ट अंश या रूपात स्पष्टपणे परिभाषित केले जाते. हा महिना ग्रेगोरिअन कॅलेंडरचा एक मानक भाग आहे; हा प्रत्येक वर्षी एकाच वेळी येतो [पाचव्या महिन्यात, एप्रिल महिन्यानंतर आणि जून महिन्यापूर्वी]; हा विशिष्ट दिवसांमध्ये आणि आठवड्यांमध्ये विभागला गेला आहे. तथापि, सिद्धयोग मार्गावर, आपल्यासाठी हा महिना बाबा मुक्तानंदांशी संबंधित आहे—आपल्यासाठी हा महिना बाबांच्या जीवनाशी, त्यांच्या वारशाशी निगडित आहे—म्हणून यामध्ये समयातीत असण्याची आभादेखील आहे.

आणि आपल्याला हे जाणवते, उदाहरणार्थ, जेव्हा आपल्याला निसर्गात 'बाबांची चिह्ने' दिसतात, जसे की वृक्षांमध्ये जेव्हा इंग्रजी अक्षर 'एम'चा आकार दिसतो [इंग्रजी अक्षर 'M' 'एम', 'मुक्तानंद' या बाबांच्या नावाचे आद्याक्षर] किंवा जेव्हा आपण असा एखादा पंख पाहतो ज्यात बाबांच्या भगव्या रंगाच्या वस्त्रांची छटा असते किंवा मग जेव्हा आपण आकाशात तरंगणारे कृष्णवर्णी मेघ पाहतो, जे जवळजवळ नीलबिंदूसमान दिसतात, ज्याचे वर्णन करणे बाबांना अतिशय प्रिय होते,

तेव्हा आपल्याला बाबांची ही समयातीत आभा जाणवते. लोक बाबांच्या सान्निध्यात त्यांना आलेले अनुभव किंवा प्रसंग जेव्हा सांगतात, तेव्हा आपल्याला बाबांची समयातीत आभा जाणवते. उदाहरणार्थ, मी बाबांचे दर्शन कधीच घेतले नाही, कारण माझा जन्मच मुळी बाबांनी महासमाधी घेतल्यानंतर झाला होता. परंतु, बाबांच्या जीवनकालाच्या दरम्यान ज्या लोकांना बाबांचे दर्शन झाले आहे, ज्यांना बाबांकडून शिकवणी मिळाल्या आहेत, ज्यांना बाबांचे सान्निध्य प्रत्यक्ष लाभले आहे, अशा लोकांकडून जेव्हा मी बाबांविषयीचे प्रसंग ऐकते, तेव्हा मला असे वाटते की, जणू समय लुप्त झाला आहे. त्यांच्या डोळ्यांतून प्रेम ओसंडून वाहत असते, सद्गदित झालेल्या त्यांच्या वाणीत एक अनोखी मृदुलता मला जाणवते, त्या वेळी मला प्रकर्षाने जाणवते की, बाबा आत्ता, अगदी *इथेच* आपल्यासमवेत आहेत.

एक फूल उमलते आणि कोमेजते; तरीही त्याचे सौंदर्य, त्याचा मनमोहक सुवास हा जे त्याचे स्मरण करतात त्यांच्या मनात कायम दरवळत राहतो. नदीच्या पात्रातील पाणी आटते, तरीही त्याच्या प्रवाहाची आठवण भूपृष्ठावर कोरलेली राहते; माती आणि तळभाग यांच्यातील नागमोडी खाचांमध्ये नदी तिची छाप सोडते. चंद्र त्याच्या सर्व कलांमध्ये आकार जरी बदलत असला, तरी तो सदैव पूर्णच असतो. समयातीतता म्हणजे काय? ते असे काही आहे का, की जे आपण जाणतो व जे आपल्याला ज्ञात आहे, की ते असे काहीतरी आहे ज्याची आपण रचना करतो? ते असे काही आहे का, की ज्याला आपण एक बृहद् रूप देतो? ते असे काहीतरी आहे का की, ज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे? किंवा मग, समयातीत असणे म्हणजे, एकाच वेळी हे सर्वकाही आहे का?

आपण या संपूर्ण महिन्यात या विषयावर चिंतनमनन करू शकतो. ११ मे या दिवशी जगातील अनेक भागांमधील लोक मातृदिन साजरा करतील. मी जेव्हा त्या शक्तींचा विचार करते, की ज्या समयाच्या मर्यादांच्या पलीकडे आहेत, ज्यांचे बळ आणि शुद्धता हे दोन्हीही, आपण अथवा परिस्थिती बदलल्यानंतरही किंवा आपल्या सभोवतालचे जग बदलल्यानंतरही टिकून राहतात, तेव्हा दोन गोष्टी माझ्या मनात लगेच येतात, आणि त्या आहेत, श्रीगुरूंचे प्रेम आणि एका आईचे प्रेम. खरेतर, या दोन्ही गोष्टी एकमेकांहून फारशा भिन्नदेखील नाहीत. तुम्ही हवे तर सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील हा प्रसंग वाचू शकता [किंवा पुन्हा वाचू शकता] की, श्रीगुरुमाईंना 'गुरुमाई' या नावाने कसे संबोधले जाऊ लागले. हा प्रसंग या लिंकवर उपलब्ध आहे—
www.siddhayoga.org/mothers-day/source-of-life

१२ मे या पौर्णिमेला आपण चांद्रतिथीनुसार बाबांचा जन्मदिवस साजरा करणार आहोत. त्यानंतर चार दिवसांनी, म्हणजे १६ मे रोजी, आपण सौरतिथीनुसार बाबांचा जन्मदिवस साजरा करू.

बाबांच्या कृपेमधील शाश्वतता आणि बाबांच्या प्रेमातील अनंतता आपण कशा प्रकारे अनुभवतो याविषयी थोडी चर्चा मी केली आहे. याव्यतिरिक्त आणि कदाचित सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट ही आहे की, बाबांनी आपल्याला ज्या शिकवणी प्रदान केल्या आहेत, त्या शिकवणींमध्ये आपल्याला ते शाश्वत-तत्त्व आढळून येते. [त्या अनंत-तत्त्वाशी आपली भेट होते!] सिद्धयोग मार्गाचे प्रज्ञान म्हणजेच बाबांनी प्रदान केलेल्या, श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या शिकवणी या समयातीत आहेत.

या पत्राच्या सुरुवातीला, मी विचारले होते की, ते काय आहे, जे चिरकाल टिकून राहते. त्याचे एक उत्तर आहे : *ज्ञान.* ज्ञान हे चिरकालीन आहे. श्रीगुरूंच्या शिकवणी चिरकालीन आहेत, कारण त्या सर्वकाळ आणि सर्वत्र उपयुक्त असतात.

तथापि, याविषयी एक महत्त्वाचा इशारादेखील आहे. शिकवणी समयातीत आहेत, शिकवणी चिरकालीन आहेत, याविषयीचा आपला *अनुभव* आपल्या प्रयत्नांवर निर्भर आहे अर्थात शिकवणी समजून घेण्याचा आपला प्रयत्न, त्यांचा अभ्यास करण्याचा व त्या आत्मसात करण्याचा आपला प्रयत्न यांवर निर्भर आहे. श्रीगुरूंच्या शिकवणी एका शिष्यामध्ये जे रूपांतरण घडवून आणतात, त्या रूपांतरणामध्येच शिकवणींच्या खऱ्या वारशाचे अस्तित्व आहे. आणि हे तेव्हाच घडू शकते, जेव्हा आपण तत्परतेने व सक्रियपणे यात सहभागी होऊ.

'समयाच्या समक्ष' या अंतर्गत गुरुमाई आपल्याला जानेवारी महिन्यापासून प्रदान करत असलेल्या दैनिक शिकवणींचा विचार करा. आपण असे अनुमान लावू शकतो की, प्रत्येक दिवसाची शिकवण ही सुंदर असेल, ती जिज्ञासा निर्माण करणारी व काव्यात्मक असेल आणि ती वाचल्याने व मनातल्या मनात तिचे पुन्हापुन्हा उच्चारण केल्याने आपल्याला सुख-शांती व आधार मिळेल. पण मग पुढे काय? आपण त्या शिकवणीचे *आणखी* काय करणार आहोत? सध्या प्रश्न हाच आहे.

उदाहरणार्थ, आपण १ मे या दिवसासाठी गुरुमाईंनी प्रदान केलेली शिकवण पाहू या : *"हिरण्मय समय."* तुम्ही कोणती पावले उचलू शकता जेणेकरून ही शिकवण तुमच्याकरता अधिक स्थायी वस्तुस्थिती बनेल? तुमचा समय हा 'हिरण्यमय' आहे, अर्थात स्वर्णमय आहे या जाणीवेसह कार्य करणे याचा अर्थ काय आहे? तुम्ही तुमची समयसारिणी कशा प्रकारे बनवता किंवा एखाद्या विशिष्ट समयी तुम्ही तुमचे लक्ष कुठे केंद्रित करता—यांमध्ये तुम्ही काय बदल कराल? [हे प्रश्न, अर्थातच, शिकवणीच्या एकाच अर्थावर आधारित आहेत. या शिकवणीचे अर्थ समजून घेण्याचे अन्य अनेक पैलू असू शकतात—आणि त्या पैलूंचेदेखील अशाच प्रकारे अन्वेषण करता येऊ शकते.]

मे महिन्याच्या समापनापर्यंत, आपल्याला 'समय' या विषयावर श्रीगुरुमाईंकडून १३८ शिकवणी प्राप्त झालेल्या असतील. म्हणजे आपल्याकडे १३८ संधी आहेत ज्यांयोगे आपण समयाविषयी

नवीन अंतर्दृष्टी प्राप्त करू शकतो, समयाविषयीच्या आपल्या दृष्टीकोनाला पुन्हा नवे रूप देऊ शकतो आणि आपल्या जीवनात हितकारक बदल घडवून आणण्यासाठी पावले उचलू शकतो. त्याबरोबरच, मे हा तो शेवटचा महिना असेल ज्यामध्ये आपल्याला श्रीगुरुमाईंकडून ‘समयाच्या समक्ष’ अंतर्गत शिकवणी प्राप्त होतील. पुढच्या महिन्यात आपल्या अध्ययनाचा केंद्रबिंदू असेल ‘सद्‌गुण वैभव’.

तोपर्यंत, या महिन्यातील एकतीस दिवसांचा आपण सर्वोत्तम सदुपयोग करून घेऊ या—बाबांच्या महिन्याचा उत्सव साजरा करू या, माता परमेश्वरीचा सन्मान करू या आणि वर्ष २०२५साठी श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाचे अन्वेषण करणे सुरू ठेऊ या. चला तर मग, आपण तसेच करू या, जसे श्रीगुरुमाई या वर्षाच्या त्यांच्या संदेशात शिकवतात आणि आपण खरोखर *आपला वेळ हा आपल्यासाठी लाभप्रद बनवू या.*

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.